21 OCT 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बीएआरसीमध्ये विद्यार्थी वाढवण्यासाठी प्रयत्न

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा निर्धार : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिसंवाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

बीएआरसी सोबत विद्यापीठातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना एकत्रित संशोधन करण्यासाठी तसेच बीएआरसीमध्ये जाणाऱ्या विद्यार्थांची संख्या वाढवण्यासाठी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी उपाययोजना करण्यासंदर्भात बीआरसीच्या संशोधकांशी चर्चा केली. संशोधनाचा टक्का वाढवण्यासाठी पूरक त्या उपाय योजना करण्याचा निर्धार प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी केला.

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले होते. मुंबई इंडियन सोसायटी फॉर रेडिएशन अँड फोटो केमिकल सायन्सेस (इस्राप), शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादामध्ये बीएआरसीच्या शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. बीएआरसीच्या शास्त्रज्ञांची आणि शिवाजी विद्यापीठातील प्रमुख अधिकाऱ्यांनी संशोधनावर चर्चा केली. परिसंवादामध्ये भाभा अणु संशोधन केंद्र (बीएआरसी) येथून ७ शास्त्रज्ञ, पुणे येथून ३ शास्त्रज्ञ आणि शिवाजी विद्यापीठातील १ शास्त्रज्ञ व्याख्याते म्हणून उपलब्ध झाले होते. तसेच या परिसंवादामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील २०० संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये १०६ विद्यार्थी, ३३ संशोधक विद्यार्थी, ०७ प्राध्यापक, ०१ उद्योजक, १० शास्त्रज्ञ ऑनलाइन, विभागातील ३३ प्राध्यापक असे एकूण २०० लोक सहभागी झाले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित परिसंवादात मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत प्रा. अविनाश कुंभार, डॉ. बिना सिंग, डॉ. किरणकुमार शर्मा आदी.

परिसंवादाचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते झाले. रेडिएशन, फोटो केमिकल सायन्स, नॅनो सायन्स, पौलीमार काम्पोसीट सेन्सर, न्युक्लीयर बटरी, हायड्रोजन उत्पादन, उर्जा, आणि पर्यावरण संवर्धन या विषयवर चर्चा केली. प्रमुख पाहुणे प्रा. अविनाश कुंभार व डॉ. बिना सिंग यांनी इस्राप सोसायटीची उद्दिष्टे आणि सोसायटी विद्यार्थ्यांना कशाप्रकारे आर्थिक मदत करते आणि राष्ट्रीय परिषदांचे आयोजन कसे करते याविषयी मार्गदर्शन केले. २६ संशोधक विद्यार्थ्यांनी आपले शोध सदर केले. त्यामधील उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरणास रोख १ हजार रूपये बक्षीस आणि इतर दोन विद्यार्थ्यास मानपत्र देण्यात आले. अध्यक्षपदी डॉ. किरणकुमार शर्मा होते. निमंत्रक डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.

21 OCT 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देश समृद्ध होण्यासाठी गावे स्वावलंबी होण्याची गरज

## पोपटराव पवार यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देश समृद्ध होण्यासाठी गावे स्वावलंबी होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते पोपटराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील होते. पवार म्हणाले, जातीपातीच्या पलीकडे जाऊन गावात विविध योजना राबवत कामे केली तर गावात कितीही गट-तट असले तरी ग्रामविकास साधता येतो असे सांगून त्यांनी व्यसनाधीनता, पर्यावरणविषयक, धार्मिक, शास्त्रीय, क्रीडाविषयक, ग्रामविकासाच्या विविध माध्यमांच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. नीलम जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाचे प्र.संचालक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. समाजकार्य विभागाचे सौरभ धनवडे यांनी सूत्रसंचालन केले. संध्या कांबळे यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना पोपटराव पवार. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र. संचालक डॉ. नितीन माळी आदी.**

**(छाया : नाज ट्रेनर)**

### येणारा काळ सचोटी अन् कसोटीचा

पर्यावरणाची बदलती परिस्थिती आणि वसुंधरेचा होणारा ऱ्हास लक्षात घेता येणारा काळ सचोटी व कसोटीचा असणार आहे. येत्या काळात आपणास पृथ्वीचा नवीन भूगोल बघायला मिळण्याची शक्यता पोपटराव पवार यांनी व्यक्त केली.

तरुण भारत

# 'इंडियन बॉटनिकल'च्या अध्यक्षपदी डॉ. यादव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाचे निवृत्त विभागप्रमुख, शास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांची इंडियन बॉटनिकल सोसायटीच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. त्यांच्या निवडीच्या रुपाने महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. इंडियन बॉटनिकल सोसायटीची स्थापना १९२० मध्ये नागपूरला झाली. आतापर्यंत महाराष्ट्रातून केवळ सहाजणांची निवड झाली आहे. त्यामुळे यंदा डॉ. एस. आर. यादव यांची निवड महाराष्ट्रासाठी भूषणावह आहे.



- **महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा**

डॉ. यादव आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वनस्पतीशास्त्रातील शास्त्रज्ञ आहेत. आतापर्यंत त्यांनी ३०० हुन अधिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शेकडो व्याख्याने दिली आहेत. बोटॅनिकल गार्डनमध्ये पश्चिम घाटातील एक हजारहून जास्त वनस्पती फुलवण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. १० हून अधिक प्रजातींना डॉ. यादव यांचे नाव दिले आहे. तर स्वतः ७५ हुन अधिक वनस्पती शोधून त्याचे नामकरण केले आहे.

जनसंपर्क कक्ष
21 OCT 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांची दिवाळी

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांसाठी यंदाही दिवाळी सणासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या अतिथीगृहात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमस्थळी परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच आकर्षक रांगोळी, छोटे-मोठे कंदील लावून सजावट करण्यात आली. या विद्यार्थ्यांनी परिसरात पणत्या प्रज्वलित करून प्रकाशाच्या या सोहळ्यास प्रारंभ केला.



प्रारंभी इंटरनॅशनल अफेअर्स कक्षाचे संचालक डॉ. एस. बी. सादळे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरूंच्या हस्ते यावेळी नूतन संचालक डॉ. सादळे यांच्यासह मावळते संचालक डॉ. अनिल घुले यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठातून पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल इराकचा विद्यार्थी रियाध राद अब्बॉद अल्बुरी याचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास परदेशी विद्यार्थ्यांचे संशोधन मार्गदर्शक, अधिविभागप्रमुख, टास्क फोर्स समिती सदस्य, संलग्नित महाविद्यालयातील समन्वयक उपस्थित होते. डॉ. जे. बी. यादव यांनी आभार मानले.

21 OCT 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील परदेशी विद्यार्थ्यांबरोबर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. अनिल घुले यांच्यासह अन्य प्राध्यापक व मार्गदर्शक.

# परदेशी विद्यार्थ्यांची विद्यापीठात दिवाळी

**कोल्हापूर, ता. २० :** आकर्षक रांगोळी, कंदिलांचा झगमगाट व पणत्यांच्या मंद प्रकाशात शिवाजी विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागातून दिवाळी साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. विद्यापीठाच्या अतिथीगृहात त्याचे आयोजन केले होते.

या वेळी विद्यापीठातून पीएच. डी. अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल इराकचा विद्यार्थी रियाध राद अब्बॉद अल्बुरी याचा सत्कार झाला. त्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी इंटरनॅशनल अफेअर्स कक्षाचे संचालक डॉ. एस. बी. सादळे व मावळते संचालक डॉ. अनिल घुले यांचा सत्कार झाला. संशोधन, मार्गदर्शक, अधिविभागप्रमुख उपस्थित होते. डॉ. जे. बी. यादव यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दिवाळीनिमित्त आयोजित कार्यक्रमात रांगोळी काढून दीप प्रज्वलित करताना परदेशी विद्यार्थिनी. (छाया : नाज ट्रेनर)

# शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांकडून दिवाळी साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांसाठी यंदाही दिवाळीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. कार्यक्रमस्थळी परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच आकर्षक रांगोळी, छोटे-मोठे कंदील लावून सजावट करण्यात आली. विद्यार्थ्यांनी परिसरात पणत्या प्रज्वलित करून प्रकाश सोहळ्यास प्रारंभ केला. इंटरनॅशनल अफेअर्स कक्षाचे संचालक डॉ. एस. बी. सादळे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. याप्रसंगी विद्यापीठातून पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल इराकचा विद्यार्थी रियाध राद अब्बॉद अल्बुरी याचा सत्कार करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते सर्व परदेशी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. डॉ. जे. बी. यादव यांनी आभार मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

21 OCT 2022 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांकडून दिवाळी साजरी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांनी यंदाही दिवाळी साजरी करून सणाचा आनंद लुटला. आकर्षक रांगोळी, छोटे-मोठे कंदील लावून सजावट करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पणत्या प्रज्वलित करून प्रकाश सोहळ्यास प्रारंभ केला.

इंटरनॅशनल अफेअर्स कक्षाचे संचालक डॉ. एस.बी. सादळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, नूतन संचालक डॉ. सादळे यांच्यासह मावळते संचालक डॉ. अनिल घुले यांनी सोहळ्यात भाग घेतला. विद्यापीठातून पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल इराकचा विद्यार्थी रियाध राद अब्बॉद अल्बुरी याचा सत्कार करण्यात आला. त्याच्या हस्ते सर्व परदेशी विद्यार्थ्यांना मिठाईवाटप करण्यात आले.

कार्यक्रमास परदेशी विद्यार्थ्यांचे संशोधन मार्गदर्शक, अधिविभागप्रमुख, टास्क फोर्स समिती सदस्य, संलग्नित महाविद्यालयातील समन्वयक उपस्थित होते. डॉ. जे. बी. यादव यांनी आभार मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.




शिवाजी विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांनी पणत्या प्रज्वलित करून प्रकाश सोहळ्यास प्रारंभ केला.